# जयो...स्तुते श्रीमहन्मंगले, शिवास्पदे शुभदे

जयो...स्तुते श्रीमहन्मंगले, शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवती, त्वामहं यशोयुतां वंदे ॥ धृ. ॥

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवती, श्रीमती राज्ञी तूं त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी
स्वतंत्रते भगवती, चांदणी चमचम लखलखशी
गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवती, तूंच जी विलसतसे लाली
तूं सूर्याचें तेज, उदंधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती, अन्यथा ग्रहण नष्ट तेंची
मोक्ष मुक्ति ही तुझीच रूपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती, योगिजन परब्रम्ह वदती
जें जें उत्तम उदात उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती, सर्व तव सहचारी होतें
हे अधम-रक्तरंजिते। सुजन-पुजिते। श्रीस्वतंत्रते
तुजसाठिं मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण
भरतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवती, त्वामहं यशोयुतां वंदे ॥ १ ॥

हिमालयाचा हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथें करण्याचा कां तुला वीट आला
होय आरसा अप्सरांना सरसें करण्याला
सुधाधवल जान्हवीस्त्रोत ती कां गे त्वां त्याजिला
स्वतंत्रते, या सुवर्णभूमिंत कमती काय तुला
कोहिनुरचें पुष्प रोज घे ताजें वेणीला
ही सकल-श्री-संयुता। आमुची माता। भारती असतां
कां तुवां ढकलुनी दिधली
पूवीची ममता सरली
परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्याजिलें उत्तर याचें दे
स्वतंत्रते भगवती, त्वामहं यशोयुतां वंदे ॥ २ ॥

वीर सावरकर